# विद्यापीठ विकासात ग्रंथालयीन नववी, दहावी, अकरावी, पंचवार्षिक योजनेचे योगदान

**मार्गदर्शक**
**डॉ. शकुंतला लोमटे**
माजी ग्रंथपाल
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ
औरंगाबाद

**संशोधक**
**श्रीमती निर्मला गोविंदराव बोरसडे**
ग्रंथपाल
संत ज्ञानेश्वर महाविद्यालय सोयगांव
जि. औरंगाबाद

**सारांश (Abstract):-** शिक्षण हा जगातील सर्वात मोठ्या क्रियाकलापापैकी एक आहे. भारतामध्ये जगातील सर्वात मोठी उच्च शिक्षण प्रणाली आहे. शिक्षण आणि विशेषत : उच्च शिक्षणाच्या उन्नतीसाठी विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) ही समन्वय, निर्धार आणि देखरेखसाठी स्थापना केलेली एक सर्वोच्च संस्था आहे. अध्यापन आणि संशोधनाची मानके आणि केंद्रीय निधीच्या वितरणासाठी ही संस्था सतत कार्यशील आहे. उच्च शिक्षणामध्ये ग्रंथालय सेवांचा विकास ही एक गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. ग्रंथालय सुविधा निर्माण करणे आणि त्यांचे प्रक्रिया आहे. ग्रंथालय सुविधा निर्माण करणे आणि त्यांचे बळकटीकरण करणे आणि त्यातुन अनुदान प्राप्त करणे याला अन्यन्य साधारण महत्व आहे. ग्रंथालय हे कोणत्याही शैक्षणिक वातावरणाचे प्रमुख केंद्र असते. ग्रंथालय हा अभ्यासकाचा आत्मा आहे. एक पध्दतशीर सुसज्य विकसित ग्रंथालय हे शैक्षणिक संस्थेत महत्वाची भूमिका बजावते. विद्यापीठ अनुदान आयोगाचे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे. या आयोगाला संसदेने १९५६ मध्ये घटनात्मक दर्जा दिला आहे. या आयोगांच्या अध्यक्षांचा कार्यकाळ पाच वर्षे असते. या आयोगात अध्यक्ष, उपाध्याक्ष तसेच इतर दहा सदस्यांचा समावेश असतो. या दहा सदस्यामध्ये कृषी, उद्योग कायदा आणि आरोग्य या क्षेत्राशी निगडित सदस्य असतात.

***संज्ञा (Keyword) :-*** *विद्यापीठ अनुदान आयोग, नववी, दहावी, अकरावी पंचवार्षिक योजना*

**प्रस्तावना (Introduction) :-** विद्यापीठ अनुदान आयोग (UGC) युनिव्हर्सिटी ग्रॅट्स कमिशन ही एक स्वायत्त संस्था आहे. जी सर्व विद्यापीठांना आपल्या नियंत्रणाखाली ठेवते आणि त्यांच्यासाठी मार्गदर्शन तत्वे निश्चित केली आहेत. तसचे हा आयोग विद्यापीठांच्या निर्मितीला मान्यता देतो. तसेच या सर्व विद्यापीठांना त्यांच्या आवश्यकतेनुसार अनुदान आयोग असे म्हणतात.

आधुनिक राष्ट्रसाठी शिक्षण ही काळाची गरज आहे. तसेच आवश्यक साधनापैकी एक आहे. राजकिय, बौध्दीक वैज्ञानिक आणि व्यावसायिक नेतृत्व प्रदान करणाऱ्या उच्चशिक्षणाच्या गुणवत्तेत देशाची आंतरिक बोध्दीक गतिशिलता, साधनसंपत्ती आणि सामाजिक विकास, मानवाच्या जीवनाचे कल्याण आणि सुरक्षा, जगाचा वैज्ञानिक आणि तांत्रिक आधार राष्ट्रांच्या विद्यापीठाद्वारे प्रदान केलेल्या उच्चशिक्षणाच्या गुणवत्तेवर अवलंबून असतो. ज्याचा उगम हा ग्रंथालयातून होत असतो.

मानवी संसाधनाच्या वाढीमध्ये विद्यापीठोच मोठे योगदान आहे हे उच्च शिक्षणासाठी शिकण्याचे केंद्र आहे जे पदवी, पदव्युत्तर स्तरावर शैक्षणिक सुविधा पुरविणे व संशोधन आणि विशेषीकरणासाठी सुविधा आणि पायाभुत सुविधा प्रदान करते.

विद्यापीठ ज्ञानाच्या प्रगतीमध्ये थेट योगदान देते म्हणजे विविध स्तरांचे संशोधन, सरकार, उद्योग, सेवा आणि इतर क्षेत्रांमध्ये तपास करण्यासाठी प्रशिक्षण ग्राउंड म्हणून काम करते.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 5.3
ISSN No. 2456-1665

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या स्थापनेमुळे ग्रंथालयांच्या ग्रंथसंपदेत वाढ झाली या बाबत खन्ना यांचे निरिक्षण महत्वाचे आहे ते म्हणतात की, हे खरे आहे की सुचनाच्या सिध्दांतातील सर्वात अलीकडील विकास म्हणजे माहिती साक्षरता निर्देशाचा सिध्दांत होय.

जर विद्यापीठाचा संबंध सत्याचा शोध, ज्ञानाचा विस्तार, असे केंद्र म्हणून कधीच नसतो, खरे तर सर्व शिक्षण प्रणालीमध्ये ग्रंथालय हे केंद्र स्थानी असते.

विद्यापीठाचे ग्रंथालय हे विद्यापीठाचे हृदय आहे. समाजाच्या राष्ट्रीय जीवनात ग्रंथालये महत्वाची भूमिका बजावतात. विद्यापीठाच्या शैक्षणिक उद्दिष्टयांच्या पूर्ततेसाठी कार्य करणे ही विद्यापीठाच्या ग्रंथालयाची जबाबदारी आहे. एक आधुनिक विद्यापीठ जर अनेकविध उद्दिष्टांशी संबधित असेल आणि चांगले प्रशासित तर, विद्यापीठाचे ग्रंथालय या उद्दिष्टांच्या पूर्ततेकडे आपला व्यवसाय योग्यरित्या निर्देशित करू शकते. किंबहूना विद्यापीठाच्या ग्रंथात याचे स्वरूप आणि विद्यापीठाच्या ग्रंथालयाची इमारत व गुणवत्ता यांचा जवळचा संबंध असतो. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात भारतात विद्यापीठे स्थापन झाली यात शंका नाही. तरीही सर्वसाधारण शिक्षणातील प्रगती आणि विशेषत: शैक्षणिक ग्रंथालयाची प्रगती खूपच मंद होती. १९४८ डॉ. राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली शिक्षण आयोगाची नियूक्ती सरकारची सर्वात महत्वाची कारवाई होती. भारतातील उच्च शिक्षणाच्या इतिहासातील सर्वात महत्वाची घटना म्हणजे २८ डिसेंबर १९५३ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना ही होय विद्यापीठ अनुदान आयोगाची स्थापना ही भारतातील उच्चशिक्षणाचा इतिहास आणि विकासाची ऐतिहासीक कामगिरी आहे. १९५६ पासून स्थायत्ततेने काम करित असलेल्या विद्यापीठ अनुदान मंडळाने भारतातील विद्यापीठीय ग्रंथालयाची सर्वांगीन प्रगती व्हावी या हेतूने विद्यापीठ अनुदान आयोगाने १९५७ मध्ये डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. या समितिने तयार केलेला अहवाल विद्यापीठ ग्रंथालयांच्या प्रगतीस पोषक ठरला आहे.

देशातील नागरिकांना ग्रंथालय सेवा उपलब्ध करून देणारी राष्ट्रीय, राज्य, विभागीय, जिल्हा, तालूका, ग्राम या पातळीवरील ग्रंथालयांची सूसूत्र साखळी, प्रगत राष्ट्रीय सेवा परस्पर सहकार्य हे सर्व साधारण्यासाठी ग्रंथालय कायदे महत्वाची भूमिका पार पाडतात.

भारतात सर्वप्रथम १८५७ मध्ये मुंबई, कलकत्ता, मद्रास येथे तीन विद्यापीठांची स्थापना करण्यात आली. त्यानंतर लाहोर आणि अलाहाबाद येथे विद्यापीठाची स्थापना करण्यात आली स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात १९५०-५१ मध्ये ३० विद्यापीठे आणि ६९५ महाविद्यालये होती.
स्वातंप्रयप्राप्तीनंतर विद्यापीठ आणि महाविद्यालयांचा विस्तार पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र | वर्षे | विद्यापीठांची संख्या | महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | १९५०-५१ | ३० | ६९५ |
| २ | १९६०-६०१ | ५५ | १५४२ |
| ३ | १९७०-७१ | १०३ | ३६०४ |
| ४ | १९८०-८१ | १३३ | ४७२२ |
| ५ | १९९०-९१ | १९३ | ७३४६ |
| ६ | २०००-२००१ | २५६ | १२८०६ |
| ७ | २०१०-२०११ | ५७४ | ३१५६०४ |
| ८ | २०११-२०१२ | ७०० | ३५५३६ |

(Source : University Grants Commission and Higher education in India at a galane june 2013.)

देशातील ७०० / विद्यापीठांपैकी राज्य विधान मंडळाच्या कायद्यानुसार स्थापन झालेली ३०६ विद्यापीठे ९२९, राष्ट्रीय महत्वाच्या संख्या ६७ आणि केंद्रीय विद्यापीठे ४४ आहेत. राज्य विधान मंडळाच्या कायद्याने झालेल्या विद्यापीठात ४४ टक्के विद्यार्थी शिक्षण घेतात. खाजगी विद्यापीठात २२ टक्के, अभिमत विद्यापीठात ९० टक्के केंद्रिय विद्यापीठात ६ टक्के विद्यापीठात २२ टक्के, अभिमत विद्यापीठात ९० टक्के, केंद्रीय विद्यापीठात ६ टक्के विद्यार्थी शिक्षण घेतात. उच्च शिक्षणाच्या प्रसार कार्यात राज्य विद्यापीठाचे योगदान योगदान महत्वाचे आहे.

**विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नववी, दहावी व अकारावी पंचवार्षिक योजना व त्यातील विकास योजना**

विद्यापीठ अनुदान आयोगाने केंद्र सरकारच्या पंच वार्षिक योजनांच्या शर्तीवर विद्यापीठ ग्रंथालय व तेथील पायाभूत सुविधाच्या विकासासाठी दुसऱ्या पंचवार्षीक योजनेपासून शैक्षणिक संस्थांना त्याच्या ग्रंथालय व त्या संबधित विकासासाठी यथायोग्य तरतूद केली आहे.

पंचवार्षीक योजना केंद्रीकृत आणि एकात्मिक राष्ट्रीय आर्थिक कार्यक्रम आहेत. भारताने आपली पंचवार्षीक योजना १९५१ मध्ये पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या समाजवादी प्रभावा खाली सूरू केली.

विद्यापीठ अनुदान आयागाच्या आतापर्यंत बारा पंचवार्षिक योजना पूर्ण झालेल्या असू बारावी पंचवार्षिक योजना एप्रिल २०१२ पासून चालू झालेली आहे. प्रत्येक पंचवार्षीक योजनामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाने नावीन्यपूर्ण उपक्रमार्फत विद्यापीठातील ग्रंथालयांना विकासात्मक कार्यासाठी वेळोवेळी मदत केलेली आहे.

**नववी पंचवार्षिक योजना (१९९०-२००२) :** नवव्य पंचवार्षिक योजना अंतर्गत आयोगाने विद्यार्थी संख्येवर आधारित अनुदान वितरित केले होते. त्या अनुदानाची मर्यादा रू. ६ ते १० लाख एवढी होती.

भारतामध्ये कार्यरत असलेल्या सर्व विद्यापीठ ग्रंथालयांना आयोग वाचनसाहित्य खरेदी करण्याकरिता १००% अनुदान देते. विद्यापीठ अनूदान मिळण्यासाठी त्यांच्या ग्रंथालयाला पुढील पाच वर्षामध्ये आवश्यक असणाऱ्या रकेबाबतचा प्रस्ताव आयोगाला सादर करावा लागतो. विद्यापीठ अनुदान आयोगाने नवव्या व दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये ग्रंथालय इमारतीसाठी अनूदानात वाढ करून दिली.

समाधानकारक सेवा देण्यासाठी उत्तम व प्रशस्त इमारती आधुनिक उपकरणे आणि अद्यावत फर्निचर आवश्यक असते. इतर प्रगत आणि विकसित राष्ट्रासारखे आपल्या देशातील विद्यापीठ ग्रंथालयाने वाचकाने चांगल्या गुणवत्तापूर्वक, अद्यावत, प्रचलित आणि जलद सेवा देता यावी यासाठी ग्रंथालयाचे संगणकीकरण होणे महत्वाचे आहे हे ओळखून आयोगाने विद्यापीठाच्या ग्रंथालयामध्ये संगणक देण्याची तरतूद केलेली आहे. त्यासाठी आयोग खास असे स्वतंत्र अनुदान संगणक खरेदीसाठी अनुदान उपलब्ध करून देते. नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये उपलब्ध होणारे अनुदान व त्याबाबत सर्वसाधारण धोरण यासंबंधी आयोगाने सविस्तर टिपणवजा परिपत्रक तयार केले आहे. राज्यतील सर्व अकृषी विद्यापीठांना परिपत्रक कळविले जाते.

नववी योजनेअंतर्गत विद्यापीठांना दिलेले अनुदान योजना अध्यापन अर्ज / तांत्रिक कर्मचारी / ग्रंथालयासाठी व्यावसायिक कर्मचारी.

- विस्तार कार्यक्रम
- परिक्षाविषयक सूधारणा
- शैक्षणिक परिषदामधील शिक्षकांचा सहभाग

**५०% टक्के अनुदान**

* विद्यार्थ्यांचे वस्तीगृह, प्रयोगशाळा इमारत, उपहारगृह, स्वास्थ केंद्र व त्यातील साहित्य.
  ग्रंथालयातर्फे परिसंवाद / परिषदांचे आयोजन

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र तज्ञ व्यक्तींनी एकत्रित घेवून सखोल व संशोधनात्मकदृष्ट्या चर्चा करावी, विचारांची देवाणघेवाण करावी. विषयाचे ज्ञान अद्ययावत व्हावे या उद्देशाने अनुदान ग्रंथालयांना दिले जाते.

**दहावी पंचवार्षीक योजना (२००२-२००७):** दहाव्या योजनेअंतर्गत उच्च शिक्षणामध्ये पदव्यूत्तर शिक्षण दिले जाते. उच्च शिक्षणाचा दर्जा वाढविण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे विविध योजना राबविण्यात येतात. विद्यापीठाच्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी अनुदान दिले, ग्रंथ खरेदी, नियतकालीके बूक बँक योजना, वैज्ञानिक साहित्य, परिसर विस्तार आणि शैक्षणिक साधने इत्यादी.

* **ज्यून्या इमारती दुरूस्त करणे.**

चर्चासत्रे, आणि परिसंवाद इत्यादी आयोजित करण्यासाठी अनुदान देणे.

वाचनसाहित्य खरेदी, इमारत, शैक्षणिक साहित्य, परिषदा, चर्चासत्रे, परिसंवाद यासाठी ग्रंथालयांना अनुदान दिले जाते. त्याप्रमाणे व्हिडिओ कॉन्फरन्सिंग इंटरनेट, वेब कॅमेरा याच्या माध्यमातून माहिती दिली जाते. माहिती संकलनासाठी अनुदान तसेच प्रवास अनुदानात योजना आयोगातर्फे राबविली राबविली जाते.

अकरावी पंचवार्षीक योजना (२००७-२०१२) स्वातंत्र्य प्राप्तानंतर भारतामध्ये उच्च शिक्षणाचा मोठ्या प्रमाणावर प्रसार झाला नवीन शैक्षणिक धोरणामध्ये १९८६ तसेच १९९० पासून मोठ्या प्रमाणामध्ये सरकारी धोरणामध्ये बदल करून उच्च शिक्षणामध्ये वाढ कराण्यासाठी मार्गदर्शन केले जात आहे.

***योजना***

चालू योजनामध्ये विद्यापीठ अनुदान आयोगाद्वारे महाविद्यालये आणि विद्यापीठांना नवीन इमारती बांधणे, उपकरणांची खरेदी, विद्यार्थी वस्तीगृह, ग्रंथखरेदी, दैनिक वस्तु आणि स्टाफच्या गुणवत्तेच्या सुधारणेसाठी विकास अनुदानात वाढ करणे.

प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांमध्ये उच्च शिक्षण आणि संशोधन सूविधा निर्माण करण्यासाठी सहा आंतर विद्यापीठ केंद्रे स्थापन केली आहेत. यामध्ये ICU म्हणजेच NAAC आणि INFBLIBNET यामधून अतिरिक्त सेवा निर्माण करणे.

* अकराव्या पंचवार्षिक योजनेतील नावीन्यपूर्व योजना प्रत्येक विद्यापीठामध्ये सामाजिक, आर्थिक, राजकिय आणि सांस्कृतीक कार्याचा अभ्यास करण्यासाठी स्थानिक अभ्यासावर आधारित अभ्यासक्रम नवीन पध्दतीने तयार करणे.
* सर्व महाविद्यालये व विद्यापीठे INFONET शी शोधुन ४०० जर्नल्स DIGITAL REPOSITORY उपलब्ध करून बनविण्यात येणार आहे.
* माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यासाठी ICT ची सेवा चालू राहणार आहे.
* अभ्यासक्रमामध्ये E-CONTENT चा उपयोग केला जाणार आहे.

अशाप्रकारे नववी, दहावी व अकरावी पंचवार्षीक योजनेची सदस्यस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न या लेखामध्ये करण्यात आहे.

**सारांश :**

ग्रंथालय ही वर्धिष्णू संस्था आहे असे डॉ. शियाली रामामृत रंगनाथन यांचे पंचसुत्रातील पाचवे अगदी तंतोतंत जूळते. ग्रंथालयामध्ये होणारी वाढ, ग्रंथालयाचा विस्फोट या सर्व बाबी आपणास बघावयास मिळतात. आणि वेगवेगळ्या कार्यक्रमाचे औचित्य साधून विद्यापीठ अनूदान आयोग ग्रंथालयाला भरीव असे सहकार्य करते. सदरील लेख विद्यापीठ अनुदान आयोग आणि नववी, दहावी व अकरावी पंचवार्षिक योजना ग्रंथालयामध्ये बळकटी करण्यासाठी कशाप्रकारे साहाय्य ठरतात हे आपण या लेखात अभ्यासले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाचे अनुदान प्राप्त विद्यापीठाने गुणवत्तेत वाढ करणे, परिषदा, चर्चा सत्रे गुणवत्ता विकास इ. कार्यांवर मोठ्या प्रमाणात भर दिलेला दिसून येतो.

**संदर्भ :-**

१. विद्यापीठ अनुदान आयोग, कायदा १९५६
२. भारतातील उच्च शिक्षण मानव संसाधन मंत्रालय, भारत सरकार २००१.
३. कटके, धर्मराज, मानव संसाधन विकास चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद २०१७ पृ.१४५.
४. शर्मा, एच.डी. ग्रंथालय इमारत व फर्निचर भारतीय पुस्तक केंद्र वाराणसी, १९९२.
५. रंगनाथन, एस. आर. पूर्नबांधणीसाठी योजना, पंजाब लायब्ररी असोसिएशन लाहोर १९४६ पृ २३४
६. गुप्ता, ओ. पी. स्वातंत्र्यानंतर ग्रंथालय विकास कन्सेप्ट प्रकाशन, नवी दिल्ली १९९२
७. सक्सेना, एल, एल लायब्ररी आर्गनायझेशन मॅनेजमेंट एम.पी. हिन्दी पुस्तक प्रकाशन, भोपाळ, १९९७ प- ९२०
८. विद्यापीठ अनुदान आयोगाची ५० वर्ष विद्यापीठ अनुदान आयोग प्रकाशन, नवी दिल्ली, २००३ पृ - ४३